क्र.का.९/आस्था-३/जे.या./वलि-पर्यवेक्षकएकत्रित/ 1878/2020.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांकः- 4/१२/२०२०.

**प्रति,**

१. प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई
२. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक
३. व्यवस्थापक, शा.छा.नो.का.पुणे

**विषय :-** वरिष्ठ लिपिक व पर्यवेक्षक या संवर्गाच्या दिनांक ०१/०१/२०१० व दि. ०१/०१/२०११ रोजीची तात्पुरती सेवा जेष्ठता यादी.

**संदर्भ :-** १. शासन पत्र क्रमांक - आस्थाप-२०१७/२१८४/प्र.क्र.४५९/म-१, दिनांक २८/०२/२०१८.
२. शासन पत्र क्रमांक - आस्थाप-२०१७/२१८४/प्र.क्र.४५९/म-१, दिनांक ०९/०७/२०१८.
३. शासन पत्र क्रमांक - याचिका-२०१८/२७११/प्र.क्र.२६३ /म-१, दिनांक १५/१०/२०२०.

शासनाने संदर्भित पत्रांन्वये निर्देशित केल्यानुसार नोंदणी व मुद्रांक विभागाच्या आस्थापनेवरिल वरिष्ठ लिपिक व पर्यवेक्षक या दोन संवर्गाची एकत्रित तात्पुरती सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात आली असुन ती यासोबत जोडली आहे. सदरची यादी तात्पुरत्या स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरची यादी आपले कार्यालयाचे अधिनस्त सर्व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांना पाठवावी.

सदरची यादी संबंधित कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणुन देऊन त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरीची प्रत निवेदनासोबत अथवा निवेदन नसल्यास तसे या कार्यालयास कळवुन त्यासोबत जोडण्यात यावी.

संबंधित कर्मचारी यांना सदर जेष्ठता सुचीसंदर्भात काही आक्षेप / निवेदन करावयाचे असल्यास आवश्यक कागदपत्रांचे पुराव्यासह दिनांक १८/१२/२०२० पर्यंत या कार्यालयाकडे सादर करण्यास कळवावे. निवेदने मुदतीत सादर करावीत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**का.प्र.मा.नों.म.नि. यांचे सहीची असे.**

(भरत गरुड)
**नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**